# ''एन्क्वॉयरी-ओरिएन्टेड लर्निंग ॲन्ड आऊटकम बेस्ड एज्युकेशन'' विषयावर शिक्षकांकरीता प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न






संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा युजीसी - मानव संसाधन विकास केंद्र आणि इंडियन इन्स्टिटयूट फॉर सायन्स एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने द्विदिवसीय ''एन्क्वॉयरी ओरिएन्टेड लर्निंग ॲन्ड ऑऊटकम बेस्ड एज्युकेशन'' या विषयावर युनिव्हर्सिटी रिफॉर्म्स इन ॲकॅडेमी २०२२ च्या अनुषंगाने कार्यशाळा डॉ.के.जी. देशमुख सभागृहात नुकतीच संपन्न झाली. कार्यशाळेचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरूडॉ. दिलीप मालखेडे यांचे शुभहस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर मानव्य विज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. दिपाली मालखेडे, एच.आर.डी.सी. संचालक डॉ. प्रसाद वाडेगांवकर, डॉ. सौरभ दुबे, डॉ. असीम औटी, श्री अशोक रुपनेर आदी उपस्थित होते.

